महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेस्चा प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

सायं दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619762
कॉल / व्हॉटस्अ‍ॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर RNI No. MAHMAR 2006/17624 वर्ष २० वे, अंक ४० वा शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ पाने ४ पोस्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या मराठ्यांवर सरकार गोळ्या घालणार का?

## मनोज जरांगेच्या स्वागताला लाखोंचा जनसमुदाय गावागावात क्रेन अन्? जेसीबी

## आझाद मैदानावर मराठा आंदोलकांची लाट उसळली





शिवनेरी (कटूसत्य वृत्त):- सरकारच्या हातात असताना,न्यायदेवतेची मध्यस्थी कशाला अशा शब्दांत मराठा मोर्चाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला फटकारले,मुंबईच्या आझाद मैदानावरून मराठा आरक्षणासाठी आंदोलनाला मार्गस्थ होण्यापूर्वी किल्ले शिवनेरीची माती कपाळी लावून त्यांनी मराठा आरक्षणासाठी प्रसंगी मरण्याचीही तयारी ठेवल्याचे स्पष्ट केले.

मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख,आंतरवालीचे सरपंच पांडूरंग तारख,हनुमान मुळीक,ज्ञानदेव काशिद,गंगाधर काळकुटे,बद्रीनाथ तारख,संजय गोडसे, जुन्नरमधील विविध पक्षांचे नेते सत्यशील शेरकर,ज्ञानेश्वर खंडागळे,मकरंद पाटे,सूरज वाजगे, सकल मराठा समाजाचे गणेश महाबरे,संदेश बारवे, सुनिल ढोबळे,प्रवेश देवकर आदी यावेळी उपस्थित होते. एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत शिवनेरी मार्गावर आंदोलकांनी मराठा आरक्षण घेणारच असा एल्गार केला.

किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून पारंपरिक वाद्यांच्या गजरात आंदोलक कार्यकर्ते शिवाई देवी मंदिरात आल्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते देवीची आरती झाल्यानंतर,ते शिवजन्मस्थळी नतमस्तक झाले.तेथील माती कपाळी लावून,आरक्षणाची लढाई आता आरपार असेल असे घोषीत केले.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना,त्यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. गरीब मराठ्यांचा अपमान करू नका,त्यांची मने जिंका असे सांगून खरं तर सत्ता दिली मराठ्यांनी पण तुम्ही उलटले मराठ्यांवर या शब्दांत जहरी टीका त्यांनी केली.

मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदनांना न्याय देण्यासाठी ही लढाई सुरु आहे.रायगड आणि शिवनेरी ही प्रेरणास्थळे आहेत. येथे आल्यानंतर यश मिळते हा इतिहास असल्याचे सांगून मराठा विरोधी आडमूठी भूमिका सोडून द्या,असा ईशारा राज्य सरकारला दिला.

आम्ही तर आरक्षण मिळवणारच आता थांबणार नाही असे सांगून जर एक दिवसाचे उपोषण करायला सांगता तर एक दिवसात आमच्या मागण्या का मान्य करत नाहीत,वारंवार माझ्या समाजाचा माझा अपमान करतात कारण मी मॅनेज होत नाही,हे त्यांचे दुख आहे.छत्रपतींच्या विचारावर चालणारे सरकार छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या मराठ्यांवर गोळ्या घालणार का हा प्रश्न आहे असे ते म्हणाले.

आमचे आंदोलन कायदा आणि न्यायालयाने दिलेले नियम पाळून सुरु आहे.आम्ही कायदा तोडत नाही.पण आमच्या आंदोलनाला तुम्ही हात लावाल तर माझा समाज महाराष्ट्रभर आहे हे सरकारने ध्यानात घ्यावे असा इशारा त्यांनी दिला.या आंदोलनामुळे गणेशोत्सवात अडथळा होत असल्याचा आरोप होत आहे,यावर बोलताना अडथळा करायला आमच्या हातात बंदुका आहेत का असा प्रतीप्रश्न जरांगे यांनी केला.

हिंदुंचा सण असून तुम्ही मुंबईला चाललात म्हणणारे ज्यावेळी आंतरवालीत आंदोलन सुरु होते,त्यावेळी गणपती बसले नव्हते का,मग हिंदूंच्या सणाच्या वेळी लाठीचार्ज केला ते सरकारला चालते का असे सांगून आम्ही गोळ्या झेलायला तयार मात्र आरक्षणासाठी हटायला तयार नाही,मराठ्यांच्या हक्काच्या ओबीसी आरक्षणातून आरक्षणाचा विचार सरकारने करावा असा पुनरुच्चार त्यांनी केला.

मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेनं निघाले आहेत. ठिकठिकाणी त्यांचे मोठं स्वागत केलं जात आहे.

पुण्यातील मंचर इथं मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

मंचरमध्ये क्रेन आणि जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात मनोज जरांगे पाटील यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली

शिवनेरीतील शिवाजी चौकात देखील मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागताला मोठ्या प्रमाणात गर्दी होती

मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी लोक रस्त्यावर थांबले होते.

एक मराठा लाख मराठा म्हणत मराठा आंदोलक मोठ्या प्रमाणात घोषणा देत आहेत.

एक मराठा लाख मराठा म्हणत मराठा आंदोलक मोठ्या प्रमाणात घोषणा देत आहेत.

शिवनेरी मंचरनंतर चाकणमध्ये देखील मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

आजपासून मनोज जरांगे यांचे मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरु होणार आहे.

जेसीबी आणि क्रेनच्या सहाय्याने मनोज जरांगे पाटील यांच्यावर फुलांची उधळण केली जात आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘‘मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मागे हटणार नाही. आता निर्णायक लढा मुंबईतच लढायचा आहे.‘‘ त्यांनी संपूर्ण समाजाला या लढ्याला साथ देण्याचे आवाहन केले आहे.

मोर्चाचा प्रवास आणि मार्ग बदल

असुरक्षित वळणांमुळे माळशेज घाटातील मार्ग बदलण्यात आला असून, मोर्चा आता पैठण, अहिल्या नगर, कल्याण फाटा, नारायणगाव, शिवनेरी किल्ला, चाकण, तळेगाव, लोणावळा, पनवेल मार्गे मुंबईच्या दिशेने कूच करत आहे. मोर्चाच्या प्रत्येक टप्प्यावर स्थानिक मराठा बांधवांकडून जोरदार स्वागत केले जात आहे.

रात्री मुंबईत दाखल होण्याची शक्यता

मनोज जरांगे पाटील हे आज मध्यरात्रीच्या सुमारास मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. सध्या ते जुन्नरमार्गे प्रवास करत असून, ठिकठिकाणी होत असलेल्या स्वागतामुळे त्यांच्या वेळेत थोडा विलंब होऊ शकतो. रायगड व नवी मुंबई येथे अल्प विश्रांती आणि भोजनानंतर ते आझाद मैदानात पोहोचतील, अशी शक्यता आहे.

आझाद मैदानात जय्यत तयारी, आंदोलनासाठी पूर्ण सज्जता

मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनासाठीची तयारी जोमात सुरू आहे. मंडप उभारण्यात आले असून, वाहन पार्किंगची व्यवस्था, अन्न व निवासाची सोयही करण्यात आली आहे. राज्यभरातून हजारो आंदोलक मुंबईत दाखल होत आहेत.

२९ ऑगस्टला सकाळी १० वाजता उपोषणाला सुरुवात

पोलीस प्रशासनाने दिलेल्या अटींनुसार आंदोलन ठरलेल्या वेळेत सुरू करणे आवश्यक आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता उपोषणाला सुरुवात करतील, अशी शक्यता आहे.

## दोन हजार विद्यार्थी आणि नागरिकांनी दिला डीजेमुक्त सोलापूरचा नारा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापुरात कायमस्वरूपी १०० टक्के डीजेवर बंदी आणावी या मागणीकरिता गुरुवारी सोलापुरातील विविध १२ शाळा महाविद्यालयातील २ हजार विद्यार्थी - विद्यार्थिनींनी तसेच नागरिकांनी रस्त्यावर उतरून डीजे मुक्त सोलापूरचा नारा दिला. डीजेमुक्त सोलापूर व्हावे याकरिता गुरुवारी सात रस्ता ते चार हुतात्मा पुतळा या मार्गावर मानवी साखळी



करण्यात आली.

गुरुवारी प्रारंभी मानवी साखळीच्या मार्गावरील सात रस्ता येथील महाराणा प्रताप यांच्या मूर्तीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

(पान २ वर)

## मराठा समाज सेवा मंडळावर प्रशासक नेमण्याची आ. कोठेंची नव्हे तर मराठा समाजाचीच मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठा समाज सेवा मंडळावर प्रशासक नेमण्याची मागणी आ. देवेंद्र कोठे यांनी नव्हे तर मराठा समाजाच्या वतीनेच आम्ही समाजाची ही संस्था वाचविण्याची विनंती आ. कोठे यांच्याकडे केली होती. माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. आ. देवेंद्र कोठे यांच्या सहकार्याने या संस्थेवर प्रशासक आला तर मराठा समाज त्यांना दुवाच देणार आहे.

समाजाचा रोष वाढण्यापूर्वी सपाटे यांनी स्वतःहून मराठा समाज सेवा मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी मराठा समाजातील प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

मराठा समाज सेवा मंडळावर सूडबुद्धीतून प्रशासक नेमण्याचा घाट आ. देवेंद्र कोठे हे करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी काल पत्रकार परिषदेत केला होता. त्यानंतर आज मराठा समाजातील प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेत घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी माजी उपमहापौर पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, पुरुषोत्तम बरडे,


राजन जाधव, श्रीकांत डांगे, योगेश पवार, सुनील रसाळे, नाना मस्के यांच्यासह प्रमुख नेते व माजी कर्मचाऱ्यांनी आपली मते मांडली.

संभाजीराव शिंदे प्रशालेला घरघर लागल्यामुळे छत्रपती शिवाजी शाळा बंद करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोप तर हास्यास्पद आहे.

छत्रपती शिवाजी प्रशाला ही सपाटे यांच्या चुकीच्या वर्तणुकीमुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्यांच्या जोखडातून ही संस्था मुक्त केली नाही तर मराठा समाजाचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. हे वैभव वाचविण्यासाठी आम्ही सर्वांनी पुढाकार घेतला आहे. सपाटे यांनी स्वतः मराठा समाज सेवा मंडळाचा अध्यक्ष असताना तीन किलोमीटरच्या परिघातच मराठा बहुल भागात शरदचंद्र पवार शाळेची निर्मिती करून समाजाचा विश्वासघात केला आहे, असा करत आ. देवेंद्र कोठे यांच्या सर्व समावेशक नेतृत्वामुळेच मराठा बहुल भागात समाजाने त्यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले आहे, असे नेत्यांनी स्पष्ट केले आहे.

मनोहर सपाटे यांनीच राजकीय सत्तेचा गैरवापर करून या संस्थेचा ताबा घेतला आहे. संस्था स्थापन करण्यात योगदान असलेल्या जुन्या जाणत्या सभासदांना संस्थेतून बेकायदेशीरपणे काढून आपल्या मर्जीतील नातेवाईक, कर्मचारी यांना संस्थेचे सभासद केले आहे. सपाटे यांनी समाजातीलच महिला आणि इतरांवर त्यांनी अन्याय, अत्याचार केला असल्याचा आरोप यावेळी उपस्थित नेत्यांनी केला.

सपाटे यांच्या चुकीच्या कारणामुळे समाजाची व्यापक बैठक घेऊन त्यात सपाटे यांच्यासारख्या हातातून संस्था वाचविण्यासाठी एक मुखी ठराव करण्यात आला. त्यानंतरच ही मागणी आ. देवेंद्र कोठे यांच्याकडे करण्यात आली. आ. कोठे यांच्या सहकार्याने या संस्थेवर प्रशासक आला तर मराठा समाज त्यांना दुवाच देणार आहे, असेही नेत्यांनी म्हटले आहे.




विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## वात्रटिका

**जागतिक पोलिस**

त्याचं टेरिफ आम्हाला
फायद्याचेच ठरणार आहे...
आम्ही स्वावलंबी होऊ
बघू कोण घाबरणार
आहे...।।
जागतिक पोलिस लय
तडफडत राहिला...
तुझ्या दमदाटी नि
दबावापुढे
भारत नाही नमला...।।

**हणमंत पडवळ**
**धाराशिव**
**८६९८०६७५६६**

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार
नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# संपादकीय

## नवा राजकीय त्रिकोण

जयंत माईणकरदेवेंद्र-राज-उद्धव एक राजकीय त्रिकोण बनला आहे.देवेंद्र त्रिकोणाच्या वरच्या कोनावर बसून आहेत. खालच्या दोन कोनांवर उद्धव आणि राज ठाकरे आहेत. देवेंद्र आपली सत्ता मजबूत करण्यासाठी राज यांचा वापर करत आहेत असं वाटतं. आपले बंधू उद्धव ठाकरेंना निशाणा करत सुमारे दोन दशकांपूर्वी राज ठाकरेंनी शिवसेनेशी फारकत घेतली. तेव्हापासून गेल्या महिन्यात पाच जुलैला त्याच उद्धव ठाकरे यांच्या बरोबर हिंदी भाषा सक्तीची न करण्याच्या मुद्द्यावर विजयी मेळावा घेताना राज त्याच ठिकाणी परत आले जिथून त्यांनी फारकत घेतली होती. त्यांची सर्वात वादग्रस्त ठरलेली भूमिका होती जेव्हा २०१९ साली त्यांनी लाव रे तो व्हिडिओ म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विरूद्ध प्रचाराची राळ उडवून दिली होती. वारंवार बदलत्या भूमिकेत राज पुन्हा त्याच जागी वापस आले होते ज्यांच्या नेतृत्वक्षमतेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते.

बाळासाहेब ठाकरे यांना मानणाऱ्या एका मोठ्या वर्गाला या दोन नेत्यांनी हातमिळवणी करावी अशी अपेक्षा होती. कारण दोन्ही नेते शिवसेनाप्रमाणेच महाराष्ट्राच्या हिताविषयी, मराठी माणसाच्या प्रश्नांबद्दल बोलणारे आहेत. त्यांचा स्वभाव, राजकारणाची शैली वेगळी असली तरी एकत्र आल्यास शिवसेनेचे विखुरलेले मत पुन्हा एकत्र होण्याची शक्यता होती. ते अखेर घडलं होतं. आगामी महापालिका निवडणुकीत दोन भाऊ एकत्र येऊन ७५ हजार कोटी रुपयांचं बजेट असणाऱ्या मुंबईच सुकाणू ठाकरे घराण्याच्या हातातच राहील अशी भाकिते केली जाऊ लागली. त्यासाठी उद्धव त्यांना मुख्यमंत्री पद देणाऱ्या काँग्रेसलाही समजावून सांगण्यास तयार होते.

पण कुठेतरी माशी शिंकली. त्रिकोणातील वर बसलेला कोन जागा झाला आणि राज ठाकरे गेल्या आठवड्यात मुंबईतील कार पार्किंगच्या अतिशय महत्त्वाच्या (?) मुद्द्यावर आपली मते व्यक्त करण्यासाठी आपल्या लवाजम्यासह चक्क वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले. हेही कमीच की काय म्हणून पाठोपाठ त्यांचे चिरंजीव अमित चक्क आशिष शेलार यांना भेटले. विषय होता सणासुदीच्या काळात परीक्षा न ठेवण्याचा. हे शेलार तेच ज्यांनी आता राज ठाकरेंच्या पाच जुलैच्या भाषणावर टीका केली होती. या दोन्ही भेटी केवळ पार्किंग आणि परीक्षा या विषयापुरत्याच मर्यादित असतील असं वाटत नाही. या दोन्ही भेटीत बरंच पाणी मुरलं आहे. या भेटीमुळे उद्धव-राज युतीची शक्यता कमी झाली आहे, तर भाजपने आपले राजकीय गणित अधिक मजबूत केले आहे. राज ठाकरेंनी आपली भूमिका धरसोड वृत्ती कायम ठेवली आहे.

आता राज यांच्यापेक्षा हुकमी अल्पसंख्याक, दलित मते मिळवून देणारी काँग्रेस उद्धव ठाकरे यांना योग्य वाटणं साहजिकच आहे. त्यातच देशातील प्रत्येक प्रादेशिक पक्षाला एक तर भाजप किंवा काँग्रेसच्या पंखाखाली जाणं हे क्रमप्राप्तच आहे. आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडू यांनी भाजपची साथ दिल्याने वायएसआर काँग्रेसचे जगन रेड्डी यांना इच्छा असो वा नसो काँग्रेसला साथ देणं क्रमप्राप्तच आहे. इंडिया आघाडीने तेलुगू बिड्डा उमेदवार उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत दिल्याने जगन रेड्डी काँग्रेसला साथ देतील.

या घटनेनंतर उद्धव यांचा समर्थक वर्ग राज ठाकरे यांच्याकडे संशयाने पाहू लागला. तसेच काँग्रेस-राष्ट्रवादीसुद्धा उद्धव-राज युतीला मान्यता देतीलच याची खात्री नाही. त्यामुळे ही बैठक उद्धव ठाकरे यांच्यासाठी राजकीय दृष्टीने नक्कीच धोक्याची घंटा आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे भाऊ असूनही दीर्घकाळ राजकारणात प्रतिस्पर्धी राहिले. उद्धव ठाकरेंना विरोध करत राज यांची मनसे सुरुवातीला मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर जोरदार उभी राहिली, पण काळानुसार पक्षाची ताकद कमी होत गेली.

राज आणि उद्धव एकत्र येतील, अशी चर्चा रंगत असतानाच फडणवीसांसोबत झालेली ही बैठक त्यांच्या समीकरणाला धक्का पोहोचवणारी आहे. उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत आघाडी टिकवून आहेत. त्यांनी केंद्रातील भाजप सरकारवर सातत्याने टीका केली आहे. अशा वेळी त्यांचा भाऊ राज ठाकरे जर भाजपच्या जवळ गेले, तर उद्धव-राज युतीची शक्यता जवळपास संपुष्टात येईल. राज भाजपबरोबर गेल्यास त्यांचा मराठी अस्मितेचा चेहरा धूसर होईल.अशा पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची झालेली गुप्त किंवा क्लोज डोअर बैठक अनेक प्रश्न निर्माण करते.

भाजपला मनसेची साथ हवी आहे का? किंवा उद्धव-राज युती होऊ नये यासाठी भाजप राज ठाकरे यांच्याशी आधीच गाठीभेट घेत आहे का? भाजपला पुढील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता आणखी काही मराठीवादी मतांची गरज आहे. मनसेकडे मतांचे फार मोठे बँक नाही, पण ठराविक भागात मनसेचा प्रभाव आहे. त्याशिवाय, राज ठाकरे यांची भाषणशैली आणि जनतेशी संवाद साधण्याची क्षमता भाजपसाठी उपयुक्त ठरू शकते. याच कारणामुळे भाजप राज ठाकरे यांना आपल्या जवळ ठेवू पाहत आहे, असे मानले जाते.

यामुळे उद्धव-राज युती होण्याची शक्यता कमी करून भाजप एक प्रकारे डॅमेज कंट्रोल करीत आहे. भविष्यात या बैठकीचा परिणाम लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दिसेल. मनसेला काही राजकीय संजीवनी मिळेल का, की पक्ष पुन्हा भाजपच्या सावलीत विरघळून जाईल हे आगामी काही महिन्यांत स्पष्ट होईल. मात्र इतके नक्की की या बैठकीने उद्धव-राज युतीच्या स्वप्नाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे आणि महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा अनिश्चिततेकडे वळली आहेत.

✻ पान १ वरुन ✻

### ✻ छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या...

यांच्या पुतळ्यास तसेच सोलापूरच्या चार हुतात्म्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून मानवी साखळीस प्रारंभ झाला.

या मानवी साखळीमध्ये संगमेश्वर महाविद्यालय, सुयश विद्यालय, हिंदुस्थानी कॉन्व्हेंट स्कूल, रॉजर्स स्कूल, मेरी बी हार्डिंग स्कूल, हरिभाई देवकरण प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी, मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सेवासदन प्रशाला, सिद्धेश्वर प्रशाला अशा १० शाळा आणि महाविद्यालये सहभागी झाली होती.सात रस्ता येथून प्रारंभ झालेली मानवी साखळी रंगभवन, होम मैदान, डफरीन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे चार हुतात्मा पुतळा परिसरापर्यंत तयार करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी डीजे मुक्त सोलापूर झालेच पाहिजे, बंद करा बंद करा कर्णकर्कश डीजे बंद करा अशा घोषणा दिल्या. तसेच डीजे मुक्त सोलापूर झाले पाहिजे या मागणीचे फलक हाती धरले होते.

भर पावसात रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक-गुरुवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. तरीही पावसाला न जुमानता डीजेमुक्त सोलापूरसाठी सरसावलेल्या शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींचे सोलापूरकरांनी कौतुक केले.

प्रबोधन

## थोर व्यक्ती पद्मश्री विठ्ठलराव । सुपुत्र देशाचे

राजर्षी शाहू आणि बडोदानरेश सयाजीराव गायकवाड यांचे निष्ठावंत अनुयायी म्हणजे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, अर्थात, सार्वजनिक आप्पा! (जन्म: २९ ऑगस्ट १९०१; मृत्यू: २७ एप्रिल १९८०) लोणी बुद्रुक आताचं प्रवरानगर या खेड्यात जन्मलेले विठ्ठलराव शालेय जीवनापासूनच परोपकारी, सेवाभावी आणि उद्यमशील होते. शिक्षण बेतास बात झालेल्या या लोकश्रीबद्दल कवी प्रा.बा.ह. कल्याणकर म्हणतात- नव्हते तुझ्याजवळ धन, अथवा नव्हते पुस्तकी ज्ञान ।

अनुभवायचे विद्यापीठच होते, मर्द मावळ्या तुझे नांगरी मान ।।

अनुभवाच्या विद्यापीठाच्या या स्नातकाने आपल्या अनुभवांच्याच नांगराने सहकार, शिक्षण, आरोग्य, दारिद्र्य या सर्वच लोकोपयोगी जमिनींची छान नांगरणी केली आणि सामान्यांचं आयुष्य सुखी करणारं पीक भरभरून काढलं.

१९६१ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंनी प्रधानमंत्री म्हणून प्रवरानगरला भेट दिली. पद्मश्रींचं कार्य पाहिलं, कर्तृत्व पाहिलं आणि त्यांना पंडितजींनी खरे राष्ट्रभक्त ही पदवी उत्स्फूर्तपणे बहाल केली. नेहरू म्हणाले, आज मी विखे पाटलांच्या राजधानीत आलो आहे. विद्वान व श्रीमंत माणसं मोठं कार्य करतात हे मला माहीत आहे; परंतु कमी शिकलेली लहान माणसंदेखील मोठं कार्य करू शकतात, हे आज कळलं. आज देशाला राष्ट्रभक्तीची गरज आहे. विखे पाटील खरे राष्ट्रभक्त आहेत. विठ्ठलराव आपले समानधर्मा आहेत, हे पंडितजींना उमजलं होतं, म्हणून तर त्यांनी प्रवरानगरचा दौरा केला. भूमिपुत्र या चरित्राचे लेखक राजा मंगळवेढेकर लिहितात, वस्तुतः गोरगरिबांविषयी असीम कळवळा, ही कम्युनिझममधील आणि विठ्ठलरावांमधील मूलभूत प्रेरणा एकाच जातकुळीची होती. विठ्ठलरावांच्या जीवनकार्यावर राजा मंगळवेढेकर यांचं भूमिपुत्र, प्रसिद्ध साहित्यिक शिवाजी सावंत यांचं लढत हे चरित्रग्रंथ आहेत. अलीकडेच डॉ.राजेंद्र वडनेरे यांचा महामेरू हा चरित कहाणीचा ग्रंथ प्रकाशित झालाय.

विठ्ठलरावांच्या तरुणपणी १९१८मध्ये अहमदनगर जिल्ह्यात मोठा दुष्काळ पडला. त्याचा लाभ उठवून सावकारांनी अडल्या-नडल्या शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत केल्या. समोर घडलेल्या या घटनेनेच विठ्ठलराव कार्यप्रवृत्त झाले. कंगाल किसानांना दुःखमुक्त करण्यासाठी त्यांनी सहकारी संस्था स्थापनेचा जो डोंगर उभा केला तो क्रांतिकारक आणि प्रेरणादायक होता. २३ जानेवारी १९२३मध्ये लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी नोंदवून विठ्ठलरावांनी आपल्या जीवनकार्याला सहकारमय केलं. १९२१ मध्ये राजुरी या छोट्या गावात सहकारी सोसायटी स्थापन केली. आदिवासी समाजाला सहकाराच्या संस्कारात आणण्यासाठी त्यांनी चास गावीही सोसायटीची स्थापना केली. १९४४मध्ये वडार समाजाला सहकारी सोसायटी सुरू करून दिली आणि शेतीची सोसायटी हा उपक्रम त्यांनी राबवून आपलं कार्य अक्षरशः तळागाळापर्यंत नेलं. गरीब शेतकऱ्याला भंडारदरा धरणाचं पाणी मिळावं म्हणून ज्या पाणी-परिषदा त्यांनी भरवल्या त्या रंजक कथा पाणी कथा म्हणून प्रसिद्ध आहेत.

२६ नोव्हेंबर १९५० हा दिवस पद्मश्री विखे पाटील यांच्या आयुष्यातील सुवर्णाक्षरांनी लिहिण्याइतका असाधारण दिवस होता. भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना काढून विठ्ठलरावांनी देशात नवं मन्वंतर सुरू केलं होतं. त्यानंतर देशात अनेक ठिकाणी या उपक्रमाचं अनुकरण झालं. विठ्ठलरावांनी गावोगावी सहकारी पतसंस्था काढण्यास चालना दिली. सहकारी तत्त्वावर बँक, खरेदी-विक्री संघ, किराणा- भुसाराची दुकानं, डी.एल.बी. मेंबरशिप, वाचनालय, शिक्षणसंस्था, हॉस्पिटल, वनिता विकास मंडळ यांची सुरुवात त्यांनी केली आणि जनावरांची प्रदर्शनं भरवणं, शेतकरी मेळावे घेणं, हेही उपक्रम चालू ठेवले. गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, बाळासाहेब देसाई, ना. यशवंतराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, वैकुंठभाई मेहता, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, ना. अण्णासाहेब शिंदे, राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, बाळासाहेब भारदे, भाऊसाहेब शिंदे, डॉ. धनंजयराव गाडगीळ अशा मान्यवरांच्या भेटी आणि शुभेच्छा विठ्ठलरावांच्या कार्याला उदंड लाभल्या. विठ्ठलरावांना १९६२मध्ये भारत सरकारने पद्मश्री हा किताब देऊन सन्मानित केलं. १९७८मध्ये पुणे विद्यापीठाने डी.लीट; तर १९७९मध्ये महात्मा फुले-राहुरी कृषिविद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीने विठ्ठलरावांचा सन्मान केला.

पद्मश्री विठ्ठलराव सामान्यांतील असून असामान्य होते. कोणतंही अधिकारपद ग्रहण करायचं नाही आणि दुसऱ्यांचं अन्न कधी खायचं नाही, हे दोन नियम त्यांनी जन्मभर पाळले. ना. यशवंतराव चव्हाण म्हणतात, पहिला साखर कारखाना चालवण्याकरता स्वतः पाठीमागे राहून त्यांनी इतरांना मदत केली. हा त्यांचा स्वभावविशेष होता आणि जन्मभर कोटाच्या खिशात चटणी भाकरीचं गाठोडं ठेवून ते जगले. मेजवान्यांच्या ठिकाणीसुद्धा आपली भाकरी खाऊनच ते भूक भागवीत. भारतीय समाजाला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवणाऱ्या या थोर पुरुषाला शतशः प्रणाम करताना म्हणावंसं वाटतं-

पद्मश्री विठ्ठलराव । सुपुत्र देशाचे ।
दीनांच्या सुखाचे । स्वप्न पाही ।।१
कृषि-उद्योगाची । उभारी पंढरी ।
झोपडीच्या दारी । सुख आणी ।। २
धन ना शिक्षण । तरी मनी इच्छा।
झटे सुख द्याया । गरिबांना ।। ३
नवा भगीरथ । जाणे देशहित ।
वावरे लोकात । ज्ञान देण्या ।।४
परान्न मानले । त्याज्य जन्मभर ।
घरची भाकर । प्यारी त्यांना ।।५
समाजसेवेचे । खडतर व्रत ।
घेई अविश्रांत । कष्टमूर्ती ।।६
कार्याची आवड । पदाची नावड ।
बोले परखड । तत्त्वनिष्ठ ।।७
थोर राष्ट्रभक्त । मानवताप्रेमी।
मार्ग दावी नामी । सहकाराचा ।।८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

प्रबोधन

## ध्येयवादी चाले। साहसाच्या बळे

शतेषु जायते शूरा :- अर्थात, १०० लोकांतील एकजण शूर असतो, असं सुभाषितकारांचं म्हणणं आहे. पण याचा अर्थ राहिलेली सर्व ९९ माणसं भित्री असतात, असा होत नाही. कारण जिवंत राहाण्यासाठी प्राणवायू जितका आवश्यक असतो, त्याहून अधिक आवश्यक असतं, ते धैर्य किंवा धीर, साहस, धाडस. एका अनुभवसिद्ध सुविचारानुसार वित्त गेले थोडे गेले, प्रतिष्ठा गेली खूप काही गेले, पण धैर्य संपले सर्वच गेले, असं म्हटलं गेलं आहे. धैर्य संपल्यानंतर मनुष्य जिवंत राहूच शकत नाही. म्हणजेच शंभरातील एकजण शूर असतो आणि इतर लोकही त्यांच्यातील धैर्याच्या, साहसाच्या कमी-अधिक प्रमाणात असल्यामुळेच जीवन जगत राहातात.

याच संदर्भात दुसरं एक वचन साहसे श्री प्रतिवसते हे असून या वचनाचा रूढार्थ साहस करण्यामुळे संपत्ती मिळते असा घेतला जातो. पण या वचनातील श्री या शब्दाचा आपण अर्थसंकोच करीत असतो. श्री या अक्षराद्वारे सौभाग्य, यशस्विता, समृद्धी, जिवंतपणा जिवंतपणा इत्यादी अनेक गुणसमुच्चयाचं अधिष्ठान निर्देशित केलं जातं. विश्वव्यापी मानल्या गेलेल्या इंग्रजी भाषेत व्यक्तीचा उल्लेख करण्यापूर्वी , असं अतिसामान्य विशेषण लावलं जातं. पण मराठी भाषेत मात्र अत्यंत अर्थसधन, गौरववाचक, प्रतिष्ठानिर्देशक विशेषण लावून मराठीने आपण मनुष्याच्या महत्त्वमापनात विश्वभाषेपेक्षा दोन पावलं पुढे आहोत, हेच सिद्ध केलं आहे. अशा श्री या एका प्रतीकात्मक अक्षरातून अनेक उत्कृष्ट अर्थ सूचित होत असले, तरी श्रीचा आधार साहस असतं, हे विसरून चालणार नाही. राजनीतिज्ज्ञ विन्स्टन चर्चिल म्हणतात, माणसांच्या सर्व गुणांमध्ये साहस हाच मुख्य गुण आहे. कारण तो सर्व गुणांची जबाबदारी घेतो.

मात्र अत्यंत जीवनावश्यक अशा या साहसाची पातळी किंवा प्रमाण प्रत्येक व्यक्तीमध्ये कमी-जास्तही असतं आणि बदलतही राहातं. परिसर, परिस्थिती, प्रकृती आणि प्रज्ञा यांच्यात होणारे फेरबदल साहस वाढवतात किंवा कमीही करतात. लहान मुलं अज्ञानजन्य साहस करतात, तरुण माणसं उन्मादजन्य साहस करतात, धार्मिक माणसं धर्मजन्य साहस करतात, संशोधक ज्ञानाधिष्ठित साहस करतात, सत्तेची हाव राजकारण्यांच्या साहसाच्या मुळाशी असते, अविचारी लोकांचं साहस अंधश्रद्धाजन्य असतं. आणि श्रीमंतांच्या साहसाचा आधार असतो त्यांचा धनोन्मत्तपणा. सामान्य माणसं आणि साहस यांचा परस्पर संबंध मात्र खूपच विलक्षण असतो. मांजर जसं उंदराला खेळवून त्याचा जीव घेतं, तसं साहस सामान्यांचं हाल हाल करते. धरलं तर चावतं, सोडलं तर पळतं अशी त्यामुळे सामान्य लोकांची स्थिती होते.

शहाणी माणसं मात्र साहस हा जीवनावश्यक गुण आहे. हे नीट लक्षात ठेवून मनोधैर्य सतत टिकवून ठेवत असतात. त्यांचं वर्णन करताना एक कवी म्हणतात, आली जरी कष्टदशा अपार। न टाकिती धैर्य तथापि थोर ।। केला जरी पोत बळेची खाली। ज्वाला तरी ती वरती उफाळी ।। मात्र ही शहाणी माणसं अतिसाहसिक होण्यापासूनही स्वतःचा बचाव करीत असतात. अती सर्वत्र वर्जयेत ही साहसासंबंधीची त्यांची लक्ष्मणरेषा असते. साहसाचं वेड असावं; पण वेडं साहस करू नये असा जो संयमशील विचार आहे तो त्यांनी शिरोधार्य मानलेला असतो. त्यामुळे अशी माणसं आपल्या मनाची वैचारिक गती वाढवतील; पण वेगवेडे होऊन गाडी चालवणार नाहीत. खाण्याचं प्रेम जोपासतील; पण खादाडपणापासून स्वतःला दूर ठेवतील. सामाजिक उद्रेकाकडे चिकित्सकपणे पाहातील; पण स्वतः उद्रेकी होणार नाहीत. भाविकांच्या उन्मादाचा प्रकार पाहातील; पण भक्तीच्या लोंढ्यातून वाहात जाणार नाहीत.

अशा संयमशील साहसाला जेव्हा समाजसेवेचं परिमाण लाभतं. तेव्हा ते सर्वमान्य होतं. महात्माजींनी ब्रिटिशांच्या पाशवी सत्तेला अनेक प्रकारे आव्हान देण्याची साहसकृत्यं आयुष्यभर केली. पण त्याच्या मुळाही स्वातंत्र्यप्राप्तीचा उदात्त हेतू होता. पंडित नेहरूंनी गोवामुक्तीचं साहस अत्यंत चातुर्याने पार पाडलं. इंदिरा गांधींनी बांगलादेशाला साहसाची परिसीमा करून स्वातंत्र्य मिळवून दिलं. महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि इंदिराजी ह्यांचं साहस हेच खरं साहस. प्लुटार्क म्हणतात, भीतीचा त्याग करून स्वतःला संकटात टाकणे म्हणजे साहस नव्हे तर, योग्य ध्येय साध्य करण्यासाठी झटणे म्हणजे साहस!'

आज आचरट, आचरट, ओंगळवाणी साहसं करणाऱ्यांचं जगभर पेव फुटलं आहे, गिनीज बुकमध्ये आपली नोंद व्हावी म्हणून नको नको ती दुःसाहसिक कृत्यं लोक करताहेत. उंच उंच दहिहंड्या हा त्यातलाच प्रकार आहे. सुबुद्ध लोकांनी अशाचा निषेध सतत केला पाहिजे. साहसांना सीमा नसतात, त्यांना फक्त मातीच्या आणि वास्तवाच्या स्पर्शाची अट असते, हे लक्षात घेतलं तरी खूप झालं. यासाठी-

साहसात असावी। समृद्धीची दिशा
सौख्याचा दिलासा । धैर्य देते ।। १
धाडसी व्यक्तीला । आकाश ठेंगणे
विश्व भासे उणे । पराक्रमा ।। २
ध्येयवादी चाले । साहसाच्या बळे
जग सुखी झाले। त्याच्या कार्ये ।। ३
धैर्य हे जीवन। भीती हे मरण
धैर्य संजीवन । मृत्युंजयी ।।४
धैर्य प्राणवायू । आधार जीवना
नाही धैर्यहीना । पुढे गती ।।५
दुःसाहसाने मात्र । होते हानी
दुःखाची कहाणी । जन्म घेते ।।६
दुःसाहसाला । निंदावे, त्यागावे
सचेत करावे । जनलोका ।।७
धैर्याची साधना । करावी आजन्म
धन्य व्हावा जन्म। सुधैर्याने ।। ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

## हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार.

२९ ऑगस्ट १९०५ मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले.त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात.त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील १४० कोटी जनता नेहमी घेत असते.आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते.याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे.कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरूद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा ८ विरूद्ध १ गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित झाले.खेळ संपल्यानंतर हिटलरने मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले.या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले.परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वोपरी होते.त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माझ्यासाठी माझी मातृभुमि महान.१९२८ ते १९६४ हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते.कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बाण-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल. देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी,सरकारनी,शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003
Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# मोहोळ तालुक्यातील मराठा बांधवांचा मुंबईच्या दिशेने एल्गार

नरखेड (कटूसत्य वृत्त):- सकल मराठा समाजातील विद्यार्थी विद्यार्थिनींना शैक्षणिक आरक्षण नसल्यामुळे मागील अनेक वर्षापासून त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. एमपीएससी, यूपीएससी मेडिकल, इंजिनिअरिंगसह नोकरीमध्ये आरक्षण नसल्यामुळे रात्रन् ?दिवस अभ्यास करून देखील संधी मिळत नाही. कुणबी आणि मराठा एकच असताना ५८ लाख पुरावे असताना विविध गॅझेट करारामध्ये कुणबी व मराठा एक असलेले जे पुरावे आहेत. तरीसुद्धा शासन आम्हाला आमच्या हक्काच्या आरक्षणापासून वंचित ठेवत आहे. त्यामुळेच आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील



यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्यासाठीच आम्ही निघालो आहोत. घरात बसला तो मराठा कसला...,कोण म्हणतंय देत नाही घेतल्याशिवाय येत नाही... अशा घोषणा देत मोहोळ तालुक्यातील मराठा समाज भर पावसात मुंबईकडे रवाना झाला आहे.

सकल मराठा समाजाला सगेसोयरे अध्यादेश लागू करून ओबीसी मधून आरक्षण मागणीसाठी आरक्षण योद्धा मनोज जरांगे-पाटील मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. त्यांना पाठिंबा देण्यासाठी मोहोळ तालुक्यातील समाज बांधव गुरुवार, दि.२८ ऑगस्ट रोजी आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी बुधवारीच मुंबईच्या दिशेने भर पावसातच मोहोळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घेऊन रवाना झाले आहेत.यामध्ये मोहोळ शहरासह तालुक्यामधून शेकडो गाड्यांचा ताफा निघणार आहे.

स्टिकर, झेंडे, अंथरुण, पांघरून, पेस्ट ब्रश, साबण, पाणी, किराणामाल, गॅस, आचारीसह जीवनावश्यक वस्तू पंधरा ते वीस दिवस पुरेल एवढा अन्नधान्य साठा घेऊन आंदोलक मुंबईच्या दिशेने निघाले आहेत तर काही वाहने आज गुरुवारी सकाळी दहाच्या दरम्यान निघणार असून त्याची तयारी पूर्ण केली आहे. तर काही बांधव बुधवारीच मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

सोलापूरवरून सकल मराठा समाज बांधव सकाळी साडेनऊ दरम्यान सोलापूर येथून निघणार आहेत.

# अक्कलकोटमध्ये गणरायाचे उत्साहात स्वागत

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया अशा गजरांनी अक्कलकोट शहर आणि तालुका उत्साहात न्हाऊन निघाला. घरोघरी मंगलमूर्ती विघ्नहर्त्याची प्रतिष्ठापना होताच वातावरण भक्तिभाव, आनंद आणि उत्साहाने ओथंबून गेले. सकाळपासूनच नागरिकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता आणि भाविकतेचे दर्शन घडत होते. घराघरांत फुलांची सजावट, पारंपरिक तोरणे, सुगंधी धूपकांडी आणि गोडधोडाचा सुगंध दरवळू लागला होता.



सार्वजनिक गणेश मंडळांनी मात्र गणेश आगमनाचा जल्लोष अधिक रंगतदार केला. वाजतगाजत, ढोल-ताशांच्या तालावर शहराच्या मुख्य मार्गावरून मिरवणुका काढून कार्यकर्त्यांनी आपापल्या ठिकाणी मूर्ती प्रतिष्ठापना केली. काही ठिकाणी सकाळी रिमझिम पावसाने हजेरी लावली, पण भाविकांची श्रद्धा डगमगली नाही. ग्रामीण भागात तर अनेकांनी पावसातच लहान मुलांनी नाचत, भिजत आणि गात गणरायाचे स्वागत केले.

सकाळच्या आणि दुपारच्या सत्रात बाजारपेठेत प्रचंड गर्दी उसळली होती. मूर्ती विक्रीच्या दुकानांबरोबरच डेकोरेशन, लाइट्स, पुष्पहार, तोरणे, वाजंत्री व पारंपरिक वस्तूंच्या दुकानदारांकडेही खरेदीसाठी लोकांची रांग लागली. ग्रामीण भागात संध्याकाळच्या सुमारास मोठ्या मूर्तीच्या प्रतिष्ठापना करून उत्सव साजरा झाला. अनेक घरांनी पंचांगातील शुभमुहूर्त साधत गणरायाला आमंत्रण दिले.

अक्कलकोट शहरातील नवभारत गणेश मंडळ आणि लोकमान्य गणेशोत्सव मंडळ यांची तयारी विशेष चर्चेचा विषय ठरली. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सपत्नीक घरी गणरायाची स्थापना केली.तर माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदारांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य मंडळाने जुना अडत बाजार येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जल्लोषात प्रतिष्ठापना केली. या मंडळाचे उपक्रम दरवर्षी शहराचे आकर्षण ठरत असून यंदाही नागरिकांच्या उत्सुकतेचे केंद्रबिंदू बनले.

यंदा अक्कलकोट तालुक्यात एक गाव,एक गणपती या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. तब्बल ४५ गावांनी यामध्ये सहभाग नोंदवला असून मागील वर्षीच्या ४९ गावांच्या तुलनेत थोडा कमी प्रतिसाद दिसला तरी ग्रामीण भागात उत्साह मात्र ओसंडून वाहताना दिसतो आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याच्या ५७ गावांपैकी १७ गावांमध्ये आणि दक्षिण पोलीस ठाण्याच्या ७४ गावांपैकी २८ गावांमध्ये हा उपक्रम राबविला जात आहे.

शांतता कमिटीच्या बैठकीत पोलीस प्रशासनाने यंदा डीजेला फाटा देऊन पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत करण्याचे आवाहन केले होते. त्याचबरोबर रक्तदान शिबिरे, समाजोपयोगी कार्यक्रम घेण्याची सूचनाही करण्यात आली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात आणि ग्रामीण भागात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उत्तर ठाण्याच्या हद्दीत ४ पोलीस अधिकारी, ३५ अंमलदार, एसआरपीएफची तुकडी आणि ६५ होमगार्ड तर दक्षिण ठाण्यात ३ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तैनात आहेत. नगरपरिषदेकडून ठिकठिकाणी फिक्स पॉईंट ठेवून बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. वाहतुकीचे नियोजन आणि स्वच्छतेची यंत्रणा सज्ज ठेवून गणेशभक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी मन परिवर्तनाची गरज

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी मन परिवर्तनाची गरज आहे, असे मत विधी सेवा समितीच्या अध्यक्षा तथा मोहोळ न्यायालयाच्या न्यायाधीश पी.एस. गोवेकर यांनी व्यक्त केले.

मोहोळ नगरपरिषद येथे विधी सेवा समिती व विधिज्ञ मंडळ मोहोळ यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्या म्हणून न्यायाधीश गोवेकर बोलत होत्या. विधी साक्षरता शिबिरास




विधिमंडळाचे अध्यक्ष के.बी. चौधरी, ॲड. मनोज गावडे, मोहोळ नगरपरिषदेचे कार्यालयाचे अधीक्षक रणजित कांबळे, प्रियंका गोरे, अमित लोमटे, राजू शेख, हर्षल माने, किशोर स्वामी, दिलीप जाधव, विधी स्वयंसेवक महेश शिंदे, कनिष्ठ लिपिक मिथुन भडंगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

हुंडा, जात व स्त्रीभ्रूण हत्या या विषयासंबंधी आयोजित केलेल्या साक्षरता शिबिरात विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य तथा पी. एल.व्ही. राजन घाडगे यांनी आई.... नको करु... तू गं.. तुझ्या लेकीचे हाल..नको गर्भात मारु... मला जन्माला घाल... हे गीत सादर करून उपस्थितीत महिलांची मने जिंकली.

हुंडा या विषयावर ॲड. आकाश कापुरे तर स्त्रीभ्रूण हत्या या विषयासंबंधी ॲड. सुचिता इवरे यांनी विचार मांडले. या कार्यक्रमास मोहोळ नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. सोनल जानराव यांनी केले तर आभार विधी स्वयंसेवक रामलिंग महामुनी यांनी मानले.

# दत्तनगर पत्रकार कॉलनी येथे वृक्षारोपण

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- येथील दत्तनगर पत्रकार कॉलनी येथे नातेपुते नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अतुल पाटील उद्योगपती बाबाराजे बोडरे,वनपरिमंडळ अधिकारी बजरंग केंद्रे,वनक्षेत्र अधिकारी धनंजय देवकर,वनरक्षक फुलचंद तिपटे यांचे शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी अतुल पाटील म्हणाले,'' वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येकाने वृक्षारोपण करणे गरजेचे आहे.नुसते वृक्षारोपण न करता त्याचे संगोपन ही करणे महत्त्वाचे आहे.

यावेळी आनंदकुमार लोंढे,मनोज राऊत,निलेश झगडे, पंडित बोराडे,अनंतराव कोळी, आनंदराव बडवे, किशोर कारंडे,प्रविण जाधव उपस्थित होते.

# शाडूच्या मूर्त्या बनवून स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी दिली पर्यावरण रक्षणाचा संदेश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शिक्षण विभाग व सोलापूर शहर जिल्हा भारत स्काऊट आणि गाईड संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने इको फ्रेंडली गणेश मूर्ती बनविण्याचे कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उदघाटन पिपंळनेरच्या आर्या पब्लिक स्कूल प्राचार्य रवींद्र लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेत श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला, बाळीवेस सोलापूर, हरीभाई देवकरण प्रशाला सोलापूर, नेताजी सुभाष चंद्र बोस प्रशाला नीलम नगर सोलापूर आदी शाळेतील ११० स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.लोखंडे म्हणाले, पर्यावरण पूरक उत्सव साजरा करण्याचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या



उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांचे कौतुक करत प्रत्येकाने बनविलेल्या मातीची गणेशमूर्ती प्रतिष्ठापित करून पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करावा असे आवाहन केले. स्काऊट मास्टर शैलेश स्वामी यांनी विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्यासाठी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

सर्व ११० स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रत्यक्ष माती पासून मूर्ती बनवण्याचा आनंद घेतला व स्वकल्पकतेतून विविध रूपांतील गणेश मूर्ती साकारल्या.

यावेळी गाईड कॅप्टन तृप्ती खोबरे, स्काऊट मास्टर रेवणसिद्ध दसले यांनी कार्यशाळेनंतर हॅन्ड वॉश प्रात्यक्षिके दाखविली व मार्गदर्शन केले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी जिल्हा स्काऊट संघटक श्रीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया, तृप्ती खोबरे, माळी, प्रमोद जाधव, रोव्हर्स कुशल घागरे, उजेफ बागवान, रिजवाना पठाण तसेच कार्यालयीन कर्मचारी

यांनी परिश्रम घेले. जिल्हा मुख्य आयुक्त तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख साहेब, जिल्हा आयुक्त स्काऊट तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप,जिल्हा आयुक्त गाईड तथा प्राथमिक उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार व जिल्हाचिटणीस तथा माध्यमिक उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे आदींनी या सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पत्रकार हर्षद लोहार यांचे निधन:पत्रकारिता व कलाक्षेत्राने गमावला हुरहुन्नरी चेहरा

बार्शी (कटूसत्य वृत्त):- शहरातील युवा पत्रकार, हुरहुन्नरी कलाकार, रिअल न्यूज चे संपादक व व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल विंग चे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार (वय ३५) यांचे आज पहाटे ५.३० वाजता दुःखद निधन झाले.



गेल्या दोन महिन्यांपासून ते मेंदूच्या गंभीर आजाराशी झुंज देत होते. मात्र, अखेर आज त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.

पत्रकारिता, समाजकारण व कलाक्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय होते. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रासोबतच सांस्कृतिक विश्वाला मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांच्या निधनाची वार्ता कळताच मित्रपरिवार, नातेवाईक व सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईल येथे रोजगाराची संधी

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी. मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय

निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इस्त्राईल मधील नॉन वॉर झोनमध्ये घरगुती

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.





सहाय्यक (HOME BASED CAREGIVER) या क्षेत्रात युवक युवतींना रोजगाराची संधी आहे याचा जिल्ह्यातील उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या व २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे (ऑन जॉब ट्रेनिंग सह). भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवाइफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम जीएनएम / बीएससी नर्सिंग/ पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी http://maharashtrainternational.com/job.aspx या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली माहिती भरावी. अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, हणमंत नलावडे यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरुंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरुवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे- **दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गाच्या विरुध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 20

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 8 | | 1 | 3 | 4 | 9 |
| 8 | | | | 7 | 3 | 2 | 5 | |
| | | 4 | | | | 8 | 7 | |
| | 9 | 7 | | | | 1 | 3 | 2 |
| 1 | | | | 3 | | | | |
| 5 | 8 | 3 | | 1 | 9 | | | |
| 9 | | | 5 | 6 | | | | 7 |
| 6 | 7 | 8 | 3 | | | 9 | 1 | |
| | | | | | | | 8 | 3 |

# जिल्हयात ०४ सप्टेंबर रोजी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सुट

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गणपती उत्सव २०२५ चा नववा दिवस दि.०४ सप्टेंबर २०२५ रोजी ध्वनीची कायदयाने विहीत केलेली मर्यादा पाळून सकाळी ६.०० वाजलेपासून ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सुट जाहिर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद जारी केला आहे

सोलापूर जिल्हयात गणपती उत्सवावेळी सुशोभिकरण व देखावे मोठ्या प्रमाणात नागरीकांकरीता दाखविण्यात येतात यामध्ये समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमाचे देखावे इत्यादीचे आयोजन करण्यात आलेले असते.

सदरचे देखावे पाहण्यासाठी शेवटच्या तीन दिवसांत नागरीकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होत असते.

बरेच नागरीक देखावे पाहण्यासाठी संध्याकाळी उशीराने घरातुन बाहेर पडत असतात त्यामुळे ०४ सप्टेंबर २०२५ रोजी सुशोभिकरणा व देखावे याकरीता ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर करणेस रात्री २२.०० वाजे पर्यंत ऐवजी रात्री २४.०० पर्यंत वाढ करण्यात आली सदरचा आदेश हा सोलापूर जिल्हयाचे हद्दीत लागू राहिल.

दिनांक २७ ऑगस्ट २०२५ रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ अन्वये देण्यात आलेली सुट या सुधारीत आदेशान्वये रद्द करत असून त्याऐवजी दि.०४ सप्टेंबर २०२५ रोजी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धन वापराकरिता जाहिर केली आहे.

तथापी सदरची सुट शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू राहणार नाही. याची दक्षता सर्वांनी घ्यावी. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता-

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती-नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. ‘श्री गणेशा आरोग्याचा’ या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या कृपादृष्टीनेच जीवन धन्य-कुंभार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात सेवा करण्याचे भाग्य मिळाल्याने जीवन सार्थकी लागले असे प्रतिपादन नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले.



नुकतेच श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्यावतीने अण्णाराव कुंभार यांना काशी पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ.मल्लिकार्जून विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या अमृत हस्ते श्री होटगीश्वर चिंतामणी रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रित्यर्थ श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ग्रुपच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना अण्णाराव कुंभार बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवणसिधद रोडगीकर, राजकुमार भोरे, सुभाष धुमशेट्टी, रत्नमाला उकरंडे, सुनंदा मठपती यांच्यासह ३२ सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते. नेताजी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व राजराजेश्वरी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी श्री बृहन्मठ होटगीच्या संस्थेच्या सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनींच्यावतीने जेष्ठ शिक्षक शिवशरण बिराजदार, सोमनिंग कोष्टी यांच्या हस्ते अण्णाराव कुंभार यांचे शाल,पुष्प गुच्छ, हार व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रोडगीकर, भोरे, धुमशेट्टी, मठपती आदींनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यल्लप्पा व्हनकडे यांनी केले तर विश्वाराध्य मठपती यांनी आभार मानले केले.

जुन्या सहकारी शिक्षकांशी सुखदुःखाच्या चर्चा झाल्याने सर्व सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनी आनंदीत दिसून आले.राजमाने, पटेल, हुल्ले, व्हनकडे, यादव, उपासे , स्वामी, पाटील, सुतार , कोनापुरे, तेग्गेळी,म्हमाणे, देशमुख, बिजली,महादेव माळी, स्वामी, खसगी ,पाटील ,राजोळ, रामपुरे,काटकर यांच्यासह ३२ सेवानिवृत्त शिक्षक आदी उपस्थित होते.

# डीजेमुक्त सोलापूरसाठी फक्त एक मिस कॉल द्या

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- डीजेच्या आजारपणातून सोलापूरला बरे करण्यासाठी फक्त एक मिस कॉल देण्याची हाक समस्त सोलापूरकरांना वीरशैव व्हिजन व डीजेमुक्त सोलापूर कृती समितीच्या वतीने देण्यात आल्याची माहिती वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले व कृती समितीचे अध्यक्ष ॲड. धनंजय माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सध्या सोलापुरात नोकरी रोजगाराच्या संधी अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे परिणामी सोलापुरातील तरुण पुणे, मुंबई, बंगळूर अशा मोठ्या शहरात कायमस्वरूपी स्थलांतरित होत आहेत. हे रोखण्याची अत्यंत आवश्यकता असलेल्या काळात सोलापुरात विधायक कार्याऐवजी, पारंपरिक वाद्यांऐवजी तरुणांना डॉल्बी डीजेची आवड लागली आहे.

सोलापुरात होणाऱ्या विविध मिरवणुकांमध्ये लावण्यात येणाऱ्या डीजे डॉल्बीमुळे अनेक सोलापूरकरांना कानाच्या, हृदयाच्या, मेंदूच्या समस्या उद्भवत आहेत.

सोलापूरच्या सर्वांगीण विकासाच्या व आरोग्याच्या दृष्टीने ही बाब अतिशय गंभीर आणि घातक आहे. अनेक ज्येष्ठ नागरिकांना, लहान मुलांना, गर्भवती महिलांना अशा मोठ्या आवाजामुळे गंभीर समस्यांना सामोरे जावे लागण्याच्या घटना घडल्या आहेत.

यामुळे सोलापूर डीजे मुक्त व्हावे अशी सामान्य जनतेची इच्छा आहे. त्यांची इच्छा मिस कॉलच्या रूपात आमच्यापर्यंत पोहोचेल.

जितक्या नागरिकांकडून मिस कॉल येतील तेवढी संख्या पोलीस आयुक्तांना निवेदनाद्वारे देण्यात येऊन डीजे बंदीची मागणी करण्यात येणार आहे.

या उपक्रमाला वेकअप सोलापूर डिजिटल मॅगझीनचे संचालक राहुल शेटे यांचे सहकार्य लाभले आहे. कॉल केल्यानंतर मेसेज येणार आहे. याकरिता ज्यांचा डीजेला विरोध आहे त्यांनी ९१६८७२९७२९ या या क्रमांकावर मिस कॉल द्यावा असे आवाहन वीरशैव व्हिजन व डीजे मुक्त कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस डीजे मुक्त कृती समितीचे सदस्य असीम सिंदगी, कौस्तुभ करवा, वेकअप सोलापूरचे राहुल शेटे, वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी, धानेश सावळगी, सोमनाथ चौधरी उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात उपविभागीय पोलिस अधिकारी यामावार यांच्या हस्ते पूजा

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात गुरूवारी रोजी सायंकाळी ७ वा. उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांच्या हस्ते पूजा संपन्न झाली.



गेल्या दोन दिवसापासून श्रींचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत आहे. शमीवृक्षाखाली गेल्या ३२ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर व सभामंडप बांधण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमीविघ्नेश गणेश असल्याने त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे.

या प्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, रामचंद्रराव घाटगे, मुख्य पालखी संयोजक संतोष भोसले, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, रोहित खोबरे, मनोज निकम, सोमशेखर जमशेट्टी, प्रा.चंद्रकांत पाटील मुख्य सुरक्षा रक्षक महादेव अनगले, अनिल गवळी, योगेश कटारे, ज्ञानेश्वर भोसले, श्रीपाद चव्हाण, ॲड.फहीम पीरझादे, आप्पा हंचाटे, सौरभ मोरे, वैभव मोरे, पो.कॉ.विरभद्र कोल्हाटी, रोहन शिर्के अतिष पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बाळासाहेब घाडगे, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, तानाजी पाटील, अनिल बिराजदार,रमेश हेगडे, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, दरेप्पा जकापुरे, , गोरख माळी, संभाजीराव पवार, बाबुशा महिंद्रकर, विनायक भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, समर्थ चव्हाण, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

शुक्रवार दि.२९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वा. दिपक भिताडे, पोलिस निरीक्षक, उत्तर पोलिस ठाणे, अक्कलकोट यांच्या हस्ते श्रींची पूजा आयोजित करण्यात आली आहे.

# शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ चे आयोजन शांघाई येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलला भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन सहायक आयुक्त श्रीमती संगीता खंदारे, यांनी केले आहे.

शांघाई येथे आयोजित होणा-या जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित कौशल्य स्पर्धा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्कील कौन्सिल, विविध औदयोगिक आस्थापना यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेचे जिल्हा, विभाग, राज्य तसेच देश पातळीवर आयोजन करुन निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करिता वयोमर्यादा हा एकमेव निकष आहे. ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, डिजिटल कन्स्ट्रक्शन, इंडस्ट्रीअल डिझाईन टेक्नॉलॉजी, मेकाट्रॉनिक्स, रोबोट सिस्टीम इंटीग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी, आयसीटी नेटवर्क सुरक्षा, इंडस्ट्री ४.०, ऑप्टोइलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान, दंत प्रोस्थेटिक्स आणि एअरक्राफ्ट या क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि.०१ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. इतर ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि. ०१ जानेवारी, २००४ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.सदर स्पर्धेकरिता सर्व शासकीय आणि खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई, टूल रुम्स. सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी महाविदयालये, तंत्रनिकेतन महाविदयालये, आयएचएम/ हॉस्पिटॅलिटी इन्स्टिटयूट्स, कॉर्पोरेट टेक्निकल इन्स्टिटयूट, स्किल ट्रेनिंग इन्स्टिटयूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विदयापीठ, एमएसवीव्हीईटी, खाजगी कौशल्य विदयापीठ, फाइन आर्टस कॉलेज, फ्लॉवर ट्रेनिंग इन्स्टिटयूट, इन्स्टिटयूट ऑफ ज्वेलरी मेकिंग तसेच इतर सर्व महाविदयालये व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांमधील उमेदवारांची नोंदणी करता येईल.

REG NO.SUR/NSR/RSR / (R) 2012/2019DT.20/11/2019

**महिला उदयोजक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादिन सोलापूर**

**पत्ता – फ्लॅट नं ७,जुना पुणे नाका, अवंतीनगर सोलापूर**

**६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांसाठी)**

महिला उद्योजक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि संस्थेची ६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा वार शनिवार दिनांक १३.०९.२०२५ रोजी दुपारी ठीक १.३० वाजता बी-१५९, इंदिरानगर,विजापूर रोड, सोलापूर येथे होणार आहे. सदर सभेपुढील विषय खालिलप्रमाणे आहेत. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१ . मागील सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२. दि.३१.०३.२०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेला ताळेबंदपत्रक व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे व सन २०२३-२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरूस्ती अहवाल मंजुरीसाठी ठेवणे.
३ सन २०२४-२०२५ च्या नफावाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहिर करणे.
४ सन २०२४-२०२५ या सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२५-२०२६ या वर्षा करिता मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खर्च व उत्पन्नाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
५. संस्थेच्या २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व फी ठरविणे .
६. संस्थेच्या पोटनियमातील दुरूस्ती मंजूरीसाठी सादर (परिशिष्ट अ प्रमाणे) नवीन आदर्श उपविधी स्विकार करण्याबाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.
७. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात झालेल्या संचालक मंडळाच्या सभांना मंजुरी देणे.
८. संस्थेने भाडे तत्वावर घेतलेल्या जागेचे भाडे, लाईट बिल, रंगरंगोटी, टेलिफोन बिल, निश्चीत करणे व नुतनीकरण केलेल्या खर्चास मंजुरी देणे.
९ . कर्ज निर्लेखन बाबत निर्णय घेणे.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनूपस्थित असणा-या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११. संस्थेच्या संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्या कडिल कर्जाची नोंद घेणे.
१२.मा. अध्यक्षांच्या परवाणगीने आयत्या वेळी विषयांवर चर्चा करणे.

स्थळ-सोलापूर
दिनांक २८.०८.२०२५

**सही/-**
**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**शिला विजयकुमार कालेकर**
**व्यवस्थापिका**

सुचना - १. कोरम अभावी सभा स्थगित झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.

२. सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल ताळेबंद पत्रक व नफातोटा पत्रक संस्थेच्या कार्यालयात नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

३. ज्या सभासदांना या संदर्भात काही लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी सात दिवसांत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये संस्थेच्या मुख्य कार्यालय फ्लॅट नं ७ जुना पुणे नाका अवंतीनगर सोलापुर येथे लेखी स्वरूपात मुदतीच्या आत देण्यात याव्यात. मूदतीनंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही. खालिल वेबसाईटवर आमच्या संस्थेचे अजेंडा, ताळेबंद पत्रक, नफातोटा पत्रक दिले आहे. वेबसाईट www.manoramamultistate.com

**जाहीर प्रसिद्धीकरण**

तमाम नागरीकास या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे वडील हमीद वहाब हत्तुरे यांचे नांवे रिक्षा क्रं. MH-13 B 1066 हे रिक्षा असून परवाना क्रं. 629/SHR/81 प्रवासी वाहतूक परवाना आहे. माझे वडील हमीद वहाब हत्तुरे यांचे दि.२३/०१/२०१९ रोजी तर आई बानुबी हमीद हत्तुरे यांचे दि.०१/०२/२०२५ रोजी दोघांचेही निधन झाले असून त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा मुबीन अब्दुल हमीद हत्तुरे कायदेशीर वारस आहे. याकरिता मी उप. प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर यांचेकडे सदर रिक्षा व परवाना माझे नांवावर हस्तांतरण करणे करिता अर्ज केला आहे.

यात कोणाची काही हरकत वा तक्रार असल्यास ही नोटीस जाहीर झाल्यापासून ७ दिवसाचे आत सविस्तर कागदपत्रासह उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर येथे हजर रहावे. सही/-
मुबीन अब्दुल हमीद हत्तुरे

**जाहीर प्रसिध्दीकरण** एच.एम.पी. अर्ज नंबर १६५/२०२३ नि.१३

**माढा येथील मे. सि.ज.सि.डी. साहेब यांचे कोर्टात**

मनिषा प्रशांत उर्फ सिध्देश्वर पाटमस
मु.पो.कुर्डू } **अर्जदार**

**विरुध्द**

प्रशांत उर्फ सिध्देश्वर रामदास पाटमस
मु.पो.कुर्डू } **सामनेवाला**

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी यातील सामनेवाला यांचे विरुध्द सदर विवाहाचे विच्छेदन (घटस्फोट) करुन मिळणेसाठीचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे परंतु सदर अर्जातील सामनेवाला हे अर्जातील नमुद पत्यावर राहत नाहीत असा बेलिफ रिपोर्ट आलेला आहे.

त्या आर्थी उपरोक्त सामनेवाला यांना या जाहीर समन्स द्वारे सुचित करण्यात येते की, वरील अर्जाचे कामी तुम्ही स्वतः अगर निर्देशित वकीलांमार्फत ता. ०६/१०/२०२५ रोजी या मे. कोर्टात सकाळी ११ वा. हजर राहून आपला बचाव मांडावा. आपण उपरनिर्देशित तारखेस या कोर्टात हजर रहाणेस कसुर केलेस आपले काही म्हणणे नाही असे समजुन पुढील हुकूम केले जातील. याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण सही शिक्या निशी प्रसिध्द केले ता. २८/८/२०२५

**कनिष्ठ लिपीक सि.ज.सि.डि.कोर्ट माढा** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक सि.ज.सि.डि.कोर्ट माढा**

**जाहीरनामा** दि. कि.अर्ज नं. ७३२/२०२५ नि.०६

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन, यांचे न्यायालयात.**

ज्यापेक्षा कै. अर्जुन यशवंत गायकवाड हे दि. २२/०९/२००६ रोजी सोलापूर, ता. जि. सोलापूर येथे मयत झाले आहेत. तसेच कै. सुभद्राबाई अर्जुन गायकवाड हया दि. २३/०५/२०१४ रोजी सोलापूर, ता. जि. सोलापूर येथे मयत झाल्या आहेत त्यांचे पश्चात अर्जदार नं.(१) विमल भ्र. किसन गायकवाड, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम,रा. आंबेडकर उदयानच्या पाठीमागे, १६४ न्यु बुधवार पेठ, रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर, ता. जि. सोलापूर, (२) प्रकाश पि. किसन गायकवाड, वय ४५ वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर प्रमाणे,(३)सुरेश पि. किसन गायकवाड, वय ४२ वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर प्रमाणे,(४)आकाश पि. किसन गायकवाड,वय ४० वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर प्रमाणे, (५) सुहास पि.किसन गायकवाड, वय ३८ वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर प्रमाणे, हे मयताचे वारस असून,अर्जदार यांनी शासकिय, निमशासकिय कामकाजासाठी वारसांचे प्रमाणपत्र मिळण्यांसाठी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार नं. १ ते ५ हे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत त्यांनी हया न्यायालयात हजर होवून, आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयत अर्जुन यशवंत गायकवाड व मयत सुभद्राबाई अर्जुन गायकवाड यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येईल.

पु.ने.ता. २९/९/२५
आज दिनांक :-२८/८/२५

**व.लिपीक दिवाणी न्यायालय,सोलापूर (आदेशावरुन)** (शिक्का) **सहा.अधिक्षक दि. न्या.व.स्तर, सोलापूर. (आदेशावरुन)**

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि. कि.अर्ज नं. १५३/२०२५ नि.०८

**सोलापूर सोलापूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो.(वाय.ए.राणे साहेब) यांचे कोर्टात**

१) श्रीमती लक्ष्मीबाई सिध्दाराम हुळ्ळे वय-३३ वर्षे,धंदा-शेती व घरकाम
२) चि. महांतेश सिध्दाराम हुळ्ळे वय १३ वर्षे, धंदा-शिक्षण, दोघे रा.३२, भारत रत्न इंदिरानगर, ७०, फुट रोड, सोलापूर (अर्जदार नं.२ याचे अ.पा.क म्हणून अर्जदार नं.१) } **अर्जदार**

**विरुध्द**

महाराष्ट्र सरकार
(अर्जाची नोटीस मा. जिल्हा सरकारी अभियोक्तासो यांचेवर बजावण्यात यावी) } **सामनेवाला**

ज्याअर्थी, वर नमूद अर्जदारांनी जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी सोलापूर पंचायत समिती दक्षिण सोलापूर पैकी मौजे दिंडूर येथील जिराईत शेतजमीन यासी गट नं. १९६ यासी एकुण क्षेत्र ०० हेक्टर ९३ आर यासी आकार रु. ०२=५५ पैसे यापैकी पूर्व भागाची शेतजमीन ०० हेक्टर ३१ आर, यासी चतु:सिमा- पूर्वेस श्री. जमादार यांची शेतजमीन, दक्षिणेस- सत्यप्पा हुळे यांची शेतजमीन, पश्चिमेस- सदर मिळकतीपैकी लक्ष्मण हुळ्ळे यांची शेतजमीन, उत्तरेस रामपूर ते दिंडूर सरकारी रस्ता या शेतजमीनीचे विक्री करणेस परवानगी मिळणेबाबतचा अर्ज दाखल केला आहे.

अज्ञानाच्या नांवे असलेले वर नमूद मिळकत अज्ञान महांतेश सिध्दाम हुळे याच्या शिक्षणाकरिता, शिकवणीकरिता, त्यांचे कल्याणासाठी व पालनपोषणाच्या खर्चासाठी वरील शेतजमीन विक्री करणेस परवानगी मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, याबाबत कोणाची काही तक्रार/हरकत अथवा इतर कांही म्हणणे असल्यास त्यांनी स्वत:च्या अथवा वकीलामार्फत या मे. कोर्टात तारीख ३०/०९/२०२५ अथवा नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात लेखी म्हणणे मांडावयाचे असल्यास मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, कोणालाही म्हणणे मांडावयाचे नाही, असे समजून मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश करतील याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दिली ता. २८/८/२०२५

**लिपीक** (शिक्का) **अधिक्षक जिल्हा न्यायालय, सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि/४१/२०२५

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री.जनार्धन हरिबा लेंगरे,वय-६५ वर्षे,धंदा - शेती,रा. पोखरापुर, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

१) मा. तहसिलदार साहेब,ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. तहसिलदार साहेब, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.
२) ग्रामपंचायत पोखरापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक पोखरापुर. ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मयत आज्जी नर्मदा खंडू नरुटे हिचा मृत्यु वृध्दापकाळाने ता.१२/०५/१९५४ रोजी मौजे पोखरापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सामनेवाला नं. २ यांच्याकडे अर्जदाराच्या आज्जीच्या मृत्युची दाखल्याची मागणी केली असता, सामनेवाला नं. २ यांनी सदर कालावधील जन्म - मृत्यु रजिष्टर उपलब्ध नसल्याने सदरचा दाखला सामनेवाला नं. १ यांचे कार्यालयातुन घ्यावे असे तोंडी सांगितले. त्यानंतर अर्जदार याने सदर सामनेवाला नं. १ यांचेकडे अर्जदार यांच्या आज्जीच्या मृत्युच्या दाखल्याची ता. २७/०३/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता, सामनेवाला नं. १ यांनी माहे मे १९५४ सालचे रजिष्टर तपासले परंतू त्यामध्ये मयत नर्मदा खंडू नरुटे हिचे मृत्युची नोंद नसल्याबाबतचा क्र.२०२४/अभिलेख/टोकन क्र.६३३८१६/२०२५ दि. ०३/०४/२०२५ रोजी दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१२/९/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १३/०८/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन मा. तहसिलदार सो, मोहोळ**

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि/४०/२०२५

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री.जनार्धन हरिबा लेंगरे,वय-६५ वर्षे,धंदा - शेती,रा. पोखरापुर, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

१) मा. तहसिलदार साहेब,ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. तहसिलदार साहेब, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.
२) ग्रामपंचायत पोखरापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक पोखरापुर. ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची चुलत आज्जी मयत सई केमु गेना शिंदे हिचा मृत्यु वृध्दापकाळाने ता.२२/०९/१९४८ रोजी मौजे पोखरापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सामनेवाला नं. २ यांच्याकडे अर्जदाराच्या चुलत आज्जीच्या मृत्युची दाखल्याची मागणी केली असता, सामनेवाला नं. २ यांनी सदर कालावधीतील जन्म - मृत्यु रजिष्टर उपलब्ध नसल्याने सदरचा दाखला सामनेवाला नं. १ यांचे कार्यालयातुन घ्यावे असे तोंडी सांगितले. त्यानंतर अर्जदार याने सदर सामनेवाला नं. १ यांचेकडे अर्जदार यांच्या चुलत आज्जीच्या मृत्युच्या दाखल्याची ता.२७/०३/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता, सामनेवाला नं. १ यांनी माहे सप्टेंबर १९५४ सालचे रजिष्टर तपासले परंतू त्यामध्ये चुलत आज्जी मयत सई केमु गेना शिंदे हिचे मृत्युची नोंद नसल्याबाबतचा क्र.२०२४ / अभिलेख / टोकन क्र.६३३८१६/२०२५ दि. ०३/०४/२०२५ रोजी दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि. १२/९/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १३/०८/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन मा. तहसिलदार सो, मोहोळ**